करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - 55


महाराष्ट्रशासन

महसूलववनविभाग

जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग

हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१

❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖

❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्रमांक :साशा/कार्या/ब-५/करोनाविषाणु/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दिनांक :१८/०३/२०२०

वाचले :- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 25, 30, 33, 34, 41 व कलम 41

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/ आरोग्य 5 दिनांक 13/03/2020

3. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम 1897 ची नियमावली दिनांक 14/03/2020

4. साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम 1897

---

## आदेश :-

शासनाने करोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897, दि. 13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र. 02 कडील अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे.

रायगड जिल्हयामधील माथेरान येथील पर्यटन स्थळावर मोठया प्रमाणावर नागरीक पर्यटनासाठी येत असतात. यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठया प्रमाणात गर्दी होऊन त्याद्वारे करोना विषाणुचा संसर्ग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ठिकाणी होणारी गर्दी टाळून विषाणू संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रायगड जिल्हयातील माथेरान हे पयर्टन स्थळ पर्यटकांसाठी प्रतिबंधात्मक आदेश देणे आवश्यक आहे.

यामुळे मी, श्रीम. निधी चौधरी, जिल्हाधिकारी रायगड, करोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून साथरोग अधिनियम 1897 व महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम 2020 नुसार प्राप्त अधिकारांनुसार **रायगड जिल्हयातील माथेरान या पर्यटन स्थळावर जाणेसाठी सर्व पर्यटकांना दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत बंदी घालण्याचे आदेश देत आहे.**

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणेत यावी.

(निधी चौधरी)

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**

**रायगड**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

1. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
3. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
4. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
5. पोलीस अधिक्षक, रायगड
6. जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड
7. जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
8. उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत
9. तहसिलदार कर्जत
10. अधिक्षक, माथेरान
11. मुख्याधिकारी, माथेरान
12. जिल्हा माहिती अधिकारी यांना जाहिर प्रसिद्धीसाठी

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड**